बापट गुरुजी

# सद्गुणांचा बोध

उद्याच्या सोमवारी श्रावण वद्य पंचमी दिवशी दत्तावतारी मानल्या गेलेल्या परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांची जयंती आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनचरित्रातला एक प्रेरक प्रसंग इथे सांगण्यासारखा आहे. मध्य प्रदेशातल्या देवास संस्थानच्या राजेसाहेबांनी एका दत्तमंदिराची स्थापना केली. हा काळ सुमारे सन १९०५ (शके १८२७) चा होता. त्यावेळी स्वामी महाराज संन्यास धर्माला अनुसरून सतत पदभ्रमण करत असत. स्वामी महाराजांच्या हस्ते दत्तमंदिरातील प्रथम पूजा पार पडावी अशी देवासच्या राजेसाहेबांची तीव्र इच्छा होती. त्यानुसार त्यांनी गावच्या वेशीवर महाराजांचे आदराने स्वागत करण्यासाठी राजदूत पाठवले. महाराज वेशीपाशी पोहोचल्यावर त्या दूतांनी 'हेच ते संन्यासी असावेत' असा अंदाज बांधून त्यांना अडवलं आणि पालखीत बसण्याची विनंती केली. स्वामी महाराजांनी त्यांना प्रश्न केला, "तुम्हाला राजेसाहेबांनी नेमकं काय सांगितलंय ते मला सांगा बरं." तेव्हा दूत म्हणाले, "राजेसाहेब म्हणाले की, राजाधिराज योगीराज श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज इथे येतील. त्यांचे आदराने स्वागत करा आणि त्यांना राजवाड्यात घेऊन या." यावर स्वामी महाराज शांतपणे म्हणाले, "तुम्ही ज्याच्या स्वागतासाठी थांबलाय तो फार मोठा संन्यासी दिसतो. तो माझ्यासारखा अनवाणी पायाने चालत कशाला येईल? तो एखाद्या पालखीत विराजमान होऊन येईल. त्याच्याबरोबर त्याचे शिष्यगण असतील जे त्याच्यामागे छत्र-चामर ढाळत असतील. मला माझ्या वाटेने जाऊ द्या आणि तुम्ही राजेसाहेबांच्या इच्छेनुसार त्या संन्यासी महाराजांची वाट बघा!" आणि महाराज पुढे चालू लागले.



**'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'** हा नाममंत्र, तसेच दत्तपुराणासह विविध प्रकारच्या प्रचंड आध्यात्मिक वाङ्मयाची निर्मिती करत अखंड पदभ्रमण करून समाजोद्धारासाठी अतुलनीय कार्य करणाऱ्या या सत्पुरुषात किती कमालीची नि:स्पृहता आणि स्पष्टवक्तेपणा होता याचा विचार केला की मन थक्क होतं. वेदमंत्रांचा उपयोग पीडितजनांसाठी करून एकाच वेळी त्यांची दु:खे दूर करणे व लोप पावत चाललेल्या मंत्रशक्तीबाबत समाजात पुन्हा विश्वास निर्माण करणे ही दोन्ही कार्ये त्यांनी स्वत:ला श्री दत्तशक्तीचे निमित्तमात्र म्हणवून घेत साधली. प्रचंड कार्यकर्तबगारी असतानाही स्वत:कडे लघुत्व घेण्याइतकी संन्यस्त वृत्ती स्वामी महाराजांनी जीवनभर बाळगली.

दंभ बाळगण्यासारख्या एक-दोन नव्हे तर अनेक गोष्टी असतानाही कणभरही दंभ न बाळगणाऱ्या या सत्पुरुषाच्या चरित्रातून बोध घेण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. संतपुरुषांच्या अशा चरित्रावलोकनातून कित्येक सद्गुणांचा बोध घेणं शक्य असतं. शोधाल तेवढं सापडेल, आवश्यकता आहे ती फक्त मोतीदाणा वेचणाऱ्या राजहंसी वृत्तीची! ■